# गणेशोत्सवातील ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा पोहोचला मुंबई उच्च न्यायालयात

**मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) :** गणेशोत्सवातील डीजे, लाऊडस्पीकर आणि ढोल-ताशांमुळे होणाऱ्या कथित ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा मुंबई उच्च न्यायालयात पोहोचला आहे. ध्वनिप्रदूषण नियंत्रणासंदर्भात न्यायालयाने २०१६ मध्ये दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा दावा करत जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. गणेशोत्सवासह आगामी सण-उत्सवांच्या काळात ध्वनिप्रदूषण नियंत्रणाचे नियम काटेकोरपणे राबवावेत आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई करावी, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.



याचिकेत डॉ. महेश विजय बेडेकर विरुद्ध महाराष्ट्र राज्य या प्रकरणातील २०१६च्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा संदर्भ देण्यात आला आहे. ध्वनिप्रदूषण नियंत्रण नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक असल्याचे त्या निर्णयात स्पष्ट करण्यात आले होते. लाऊडस्पीकर किंवा सार्वजनिक ध्वनिक्षेपक यंत्रणा वापरण्यासाठी संबंधित प्राधिकरणाची लेखी परवानगी आवश्यक असल्याचेही न्यायालयाने नमूद केले होते. त्यामुळे गणेशोत्सवातील मिरवणुका, मंडप आणि अन्य सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये ध्वनिवर्धकांचा वापर करताना निर्धारित नियमांचे पालन करण्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

न्यायालयीन निर्देशांनुसार सामान्यतः रात्री १० ते सकाळी ६ या कालावधीत लाऊडस्पीकर, सार्वजनिक ध्वनिक्षेपक यंत्रणा किंवा ध्वनी निर्माण करणाऱ्या उपकरणांच्या वापरावर निर्बंध आहेत. मात्र, राज्य सरकार वर्षातील जास्तीत जास्त १५ अधिसूचित सण-उत्सवांच्या दिवशी रात्री १० ते मध्यरात्री १२ वाजेपर्यंत मर्यादित सवलत देऊ शकते. ही सवलत लागू असली तरी निर्धारित ध्वनिमर्यादांचे पालन करणे आवश्यक आहे. रुग्णालये, शैक्षणिक संस्था आणि न्यायालयांच्या परिसरातील शांतता क्षेत्रांसाठी अधिक कठोर नियम लागू आहेत. २०१६च्या निर्णयात अशा क्षेत्रांमध्ये लाऊडस्पीकर, ढोल तसेच अन्य वाद्यांच्या वापराबाबतही निर्बंध स्पष्ट करण्यात आले होते.

दरम्यान, नियम अस्तित्वात असूनही त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी पुरेशी होत नसल्याचा दावा याचिकाकर्त्यांने केला आहे. निवासी, व्यावसायिक, औद्योगिक तसेच शांतता क्षेत्रांमध्ये निर्धारित ध्वनिमर्यादांचे पालन व्हावे आणि उल्लंघनाच्या तक्रारींवर तातडीने व प्रभावी कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. न्यायालयीन निर्देशांनुसार निवासी क्षेत्रासाठी दिवसा ५५ आणि रात्री ४५ डेसिबल, तर शांतता क्षेत्रासाठी दिवसा ५० आणि रात्री ४० डेसिबल ध्वनीमर्यादा नमूद आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर डीजे, लाऊडस्पीकर आणि ढोल-ताशांच्या आवाजाचा प्रश्न पुन्हा न्यायालयासमोर आल्याने आगामी सण-उत्सवांमध्ये ध्वनिनियमांच्या अंमलबजावणीवर लक्ष राहणार आहे.

# आयआयटी बॉम्बेमध्ये विद्यार्थ्याच्या मृत्यूवरून संतापाचा भडका

## मध्यरात्री शेकडो विद्यार्थ्यांचे उग्र आंदोलन, सर्व परीक्षा तातडीने पुढे ढकलल्या!

**मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) :**पवई येथील आयआयटी बॉम्बेच्या विस्तीर्ण कॅम्पसमध्ये एका १९ वर्षीय द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्याच्या दुर्दैवी मृत्यूनंतर शुक्रवारी मध्यरात्री तब्बल ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी एकत्र येत उग्र आंदोलन केले. विद्यार्थ्यांच्या या वाढत्या रोषानंतर आणि कॅम्पसमधील अत्यंत तणावपूर्ण परिस्थितीनंतर आयआयटी प्रशासनाने नमते घेत सध्या सुरू असलेल्या सर्व मध्य-सत्र परीक्षा तातडीने पुढे ढकलण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. देशातील सर्वोच्च आणि अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या या तंत्रज्ञान संस्थेत घडलेल्या या घटनेमुळे शैक्षणिक वर्तुळात प्रचंड मोठी खळबळ उडाली आहे.




संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, हा विद्यार्थी ऊर्जा विज्ञान आणि अभियांत्रिकी विभागाच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत होता. शुक्रवारी सुरू असलेल्या एका महत्त्वाच्या परीक्षेदरम्यान तो मोबाईल फोनचा छुपेपणाने वापर करत असल्याचे पर्यवेक्षकांच्या निदर्शनास आले होते. या विद्यार्थ्याने परीक्षेची मूळ प्रश्नपत्रिका चॅटजीपीटीवर अपलोड करून त्यातून उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केल्याचा दावा आयआयटी प्रशासनाने केला आहे. मात्र, या गंभीर प्रकारानंतरही त्याच्यावर कोणतीही कठोर शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्यात आली नव्हती. संस्थेच्या अधिकृत निवेदनानुसार, अभ्यासक्रम प्रशिक्षक आणि संबंधित विभागप्रमुखांनी त्याला बोलावून केवळ त्याची समजूत काढली होती. तसेच, या चुकीचा त्याच्या पुढील शैक्षणिक कारकिर्दीवर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही, असा मोठा दिलासा देऊन त्याला धीर देण्याचा प्रयत्न केला होता.

परंतु, काही वेळानंतर या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याचे धक्कादायक वास्तव उघडकीस आले. पवई पोलिसांनी या घटनेची तातडीने दखल घेत सखोल तपास सुरू केला असून, मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप अधिकृतरीत्या समोर आलेले नसले तरी, या घटनेची बातमी वाऱ्यासारखी पसरताच शेकडो विद्यार्थी प्रशासकीय मुख्य इमारतीजवळ जमा झाले. वाढता शैक्षणिक ताण आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याच्या अत्यंत नाजूक प्रश्नांवर प्रशासनाच्या धोरणाबाबत विद्यार्थ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

मध्यरात्री उशिरा आयआयटी बॉम्बेचे संचालक प्राध्यापक शिरीष केदारे यांनी स्वतः आंदोलक विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष भेट घेतली, त्यानंतर सर्व परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला.

# नवले पुलाजवळ ट्रकचा भीषण साखळी अपघात; एकाचा मृत्यू

**पुणे, दि. १९ (वार्ताहर) :** नवले पूल परिसरातील भूमकर पुलावर मध्यरात्रीच्या सुमारास चार ट्रक एकमेकांवर आदळून भीषण साखळी अपघात झाला. एका मालवाहू ट्रकचे ब्रेक निकामी झाल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या दुर्घटनेत एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला, तर तीन ते चार जण गंभीर जखमी झाले. जखमींना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एक मालवाहू ट्रक भरधाव वेगाने जात असताना त्याचे ब्रेक निकामी झाले. त्यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून ट्रकने पुढे जाणाऱ्या ट्रकला जोरदार धडक दिली. या धडकेनंतर मागून येणारे आणखी तीन ट्रक एकमेकांवर आदळले. अपघाताची तीव्रता मोठी असल्याने एका ट्रकच्या पुढील भागाचा मोठ्या प्रमाणात चुराडा झाला. या ट्रकमधील एक व्यक्ती कॅबिनमध्ये अडकली होती.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांसह पोलीस आणि महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी बचावकार्य सुरू करून जखमींना बाहेर काढण्यास मदत केली. गंभीर जखमींना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, एका व्यक्तीचा घटनास्थळीच मृत्यू झाला. चार ट्रक एकमेकांवर आदळल्याने महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. अपघातग्रस्त वाहने रस्त्यावर असल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त ट्रक महामार्गाच्या बाजूला हटविले. त्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली. नवले पूल आणि भूमकर पूल परिसरात यापूर्वीही गंभीर अपघातांच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पुन्हा झालेल्या या अपघातामुळे या मार्गावरील वाहनचालकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अपघाताचे नेमके कारण आणि ब्रेक निकामी होण्यामागील परिस्थितीबाबत पोलीस तपास करीत आहेत.

# कोरेगाव भीमा हिंसाचार चौकशी आयोगाची साक्ष नोंदणी तब्बल आठ वर्षांनंतर पूर्ण

## ३१ ऑक्टोबरपर्यंत अंतिम अहवाल सादर होणार!

**पुणे, दि. १९ (वार्ताहर) :** कोरेगाव भीमा येथे १ जानेवारी २०१८ रोजी उसळलेल्या भीषण जातीय हिंसाचाराची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या विशेष चौकशी आयोगाने अखेर तब्बल आठ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर साक्षीदारांची साक्ष नोंदवण्याचे काम पूर्ण केले आहे. सेवानिवृत्त न्यायमूर्ती जे. एन. पटेल यांच्या अध्यक्षतेखाली आणि माजी मुख्य सचिव सुमित मलिक यांच्या सदस्यत्वाखालील या दोन सदस्यीय आयोगाची स्थापना फेब्रुवारी २०१८ मध्ये करण्यात आली होती. कोरेगाव भीमा युद्धाच्या २०० व्या शौर्य दिनाच्या स्मृतिदिनानिमित्त जमलेल्या नागरिकांवर झालेल्या दगडफेक आणि जाळपोळीत एका निष्पाप व्यक्तीचा मृत्यू झाला होता, तर अनेक नागरिक गंभीर जखमी झाले होते.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करताना आयोगाने तब्बल ५८ महत्त्वाच्या साक्षीदारांची उलटतपासणी नोंदवली आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार, वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यासह हिंसाचाराच्या वेळी कायदा व सुव्यवस्था हाताळणारे अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी, सनदी अधिकारी, मानवाधिकार कार्यकर्ते आणि कोरेगाव भीमा व वधू बुद्रुक येथील स्थानिक ग्रामस्थांचा




समावेश आहे. या चौकशीदरम्यान आयोगासमोर ४०० हून अधिक प्रतिज्ञापत्रे सादर करण्यात आली.

सुनावणीदरम्यान आयोगासमोर प्रामुख्याने दोन परस्परविरोधी बाजू मांडल्या गेल्या. एका बाजूने मिलिंद एकबोटे आणि संभाजी भिडे यांच्यावर हिंसाचार भडकवल्याचा थेट आरोप करत कारवाईची मागणी केली, तर दुसऱ्या बाजूने पुणे शहरात आदल्या दिवशी पार पडलेली एल्गार परिषद आणि बंदी घातलेल्या माओवादी संघटनांशी असलेल्या कथित संबंधांवरून हिंसाचार घडवल्याचा युक्तिवाद केला. सुरुवातीला केवळ चार महिन्यांची मुदत मिळालेल्या या आयोगाला साक्षीदारांची प्रचंड संख्या, पुराव्यांचा मोठा डोंगर आणि करोना महामारीच्या व्यत्ययामुळे तब्बल २३ वेळा मुदतवाढ द्यावी लागली होती.

राज्य शासनाने या आयोगाला आपला अंतिम अहवाल सादर करण्यासाठी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंतची अंतिम मुदत दिली आहे. कोरेगाव भीमा हिंसाचाराने राज्याच्या सामाजिक आणि राजकीय पटलावर अत्यंत खोल जखमा केल्या होत्या. आता प्रदीर्घ साक्ष नोंदणीनंतर आयोग आपल्या अहवालात नेमके काय निष्पन्न करतो आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कोणत्या ठोस उपाययोजना सुचवतो, याकडे संपूर्ण देशाचे डोळे लागले आहेत.

# मुंबईत आज कोणताही दिवसाचा मेगाब्लॉक नाही!

**मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) :** सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या बाप्पांच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने घराबाहेर पडणाऱ्या गणेशभक्तांना आणि मुंबईतील उपनगरीय रेल्वे प्रवाशांना एक अत्यंत मोठा आणि सुखावह दिलासा मिळाला आहे. रविवारी २० सप्टेंबर रोजी मुंबईच्या प्रमुख उपनगरीय मार्गांवर दिवसा कोणताही मेगाब्लॉक न घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय रेल्वे प्रशासनाने जाहीर केला आहे. मध्य रेल्वे आपल्या मुख्य, हार्बर, ट्रान्स-हार्बर आणि बेलापूर-उरण या सर्व प्रमुख मार्गांवर नेहमीप्रमाणे नियमित लोकल सेवा सुरू ठेवणार आहे. त्याचबरोबर सणासुदीच्या काळातील प्रवाशांची संभाव्य प्रचंड गर्दी लक्षात घेऊन पश्चिम रेल्वेनेही रविवारी दिवसा कोणताही मेगाब्लॉक न घेण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.

मध्य रेल्वेने दिवसा कोणताही मोठा ब्लॉक घेतला नसला तरी, रविवारी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत केवळ ठाणे आणि कल्याण स्थानकांदरम्यान पाचव्या आणि सहाव्या मार्गावर तांत्रिक देखभालीच्या कामांसाठी एक विशेष ब्लॉक घेतला जाणार आहे. मात्र, या ब्लॉकचा मुख्य मार्ग, हार्बर मार्ग, ट्रान्स-हार्बर मार्ग आणि बेलापूर-उरण पोर्ट मार्गावरील नियमित लोकल सेवेवर अजिबात कोणताही परिणाम होणार नाही.

# विक्रोळीत मेट्रोच्या बॅरिकेडचा दुचाकीस्वारावर घाव

**मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) :** विक्रोळी येथील एलबीएस मार्गावर मेट्रोच्या कामासाठी रस्त्यालगत उभारण्यात आलेले लोखंडी बॅरिकेड अचानक दुचाकीस्वाराच्या अंगावर पडल्याने ५४ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली. वसी हैदर असे मृत व्यक्तीचे नाव असून ते घाटकोपर येथील गौसिया चाळ परिसरात राहत होते. या प्रकरणी विक्रोळी पार्कसाईट पोलिसांनी संबंधित कंत्राटदार कंपनीसह कंपनीतील पर्यवेक्षक आणि प्रकल्प व्यवस्थापकाविरोधात गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे.

वसी हैदर शुक्रवारी दुपारी सुमारे १२ वाजता दुचाकीवरून मुलुंड परिसरात प्लंबिंगच्या कामासाठी जात होते. विक्रोळीतील एलबीएस मार्गावर रोझरी इमारतीसमोरून जात असताना दुभाजकावर उभारण्यात आलेले लोखंडी बॅरिकेड अचानक त्यांच्या अंगावर कोसळले. या दुर्घटनेत हैदर गंभीर जखमी झाले. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ त्यांना घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू करण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या घटनेची माहिती मिळताच पार्कसाईट पोलिसांनी राजावाडी रुग्णालयात धाव घेतली. हैदर यांच्या मुलाने दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी मेट्रोचे काम करणारी संबंधित कंत्राटदार कंपनी, कंपनीतील पर्यवेक्षक आणि प्रकल्प व्यवस्थापक यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नसून बॅरिकेड उभारण्याची पद्धत, सुरक्षाव्यवस्था आणि दुर्घटनेची नेमकी कारणे याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

**PUBLIC NOTICE**

**THE NOTICE** is hereby given that our clients **MONARV INFRA LLP [PAN: ACIFM1805B]** of BHIWANDI THANE, -421302 has agreed to Redevelop Plots of Land from its owner MR. NADEEM ABDUL KADIR BARDI being plots of Land bearing City Survey No. 3817, area admeasuring 380.90 Sq. Meters and City Survey No. 3818, area admeasuring 225.00, total area admeasuring **605.90 Sq. Meters,** situated at Mauje: Nizampur, Taluka: Bhiwandi, District Thane, Maharashtra – 421302.,

All or any person/persons having or claiming any right, title, benefit and/or interest whatsoever in respect of the above Shares and the Unit or on the basis of the aforesaid lost and/or misplaced documents, by way of sale, exchange, mortgage, charge, gift, lease, trust, possession, inheritance, lien, easement, bequest or otherwise howsoever, is/are hereby requested to make the same known in writing along with notarized true copies of all the documents in support of the claim, to and at the office of the undersigned, within a period of 15 days from the date of publication hereof, failing which all such claims, right, title and interest if any, shall be considered waived and/or abandoned with notice.

**PATEL & CO.**
**ADVOCATES & LEGAL CONSULTANTS.**
Office No.6, 1st Floor, Abuji Arcade,
Vanjar Patti Naka, Bhiwandi Dist- Thane – 421 302.
**Mob:- 9987365828, 7058604664 ,email: office.patel.co@gmail.com**

**Place: Bhiwandi**
**Date: 20 September, 2026**

# राजगुरुनगरात आजारी मामाची हत्या; भाच्याची आत्महत्या

**मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) :** आजारपणामुळे भाच्याच्या घरी राहण्यासाठी आलेल्या मामाची धारदार कोयत्याने वार करून हत्या केल्यानंतर भाच्यानेही गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शनिवारी (दि. १९) राजगुरुनगर येथील माधवनगर परिसरात घडली. संदीप वामन गडदे (वय ४३) यांचा हत्येत मृत्यू झाला, तर प्रवीण कैलास कोहिणकर (वय २०) याने आत्महत्या केली. एकाच घरात दोन मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी खेड पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, संदीप गडदे हे गेल्या काही महिन्यांपासून आजारी होते. उपचार आणि देखभालीसाठी ते सुमारे दोन महिन्यांपूर्वी माधवनगर येथे राहणाऱ्या भाचा प्रवीण कोहिणकर याच्या घरी आले होते. शनिवारी सकाळी प्रवीणने धारदार कोयत्याने संदीप यांच्या गळ्यावर वार केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या संदीप यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

# सोनोरीत २० लाखांच्या रस्त्याला खड्डे; अभियंत्यावर कारवाईची मागणी

**सासवड, दि. १९ (वार्ताहर) :** सोनोरी गावातील सासवड-सोनोरी रस्त्याच्या केवळ २०० मीटरच्या कामासाठी २० लाख रुपये मंजूर असतानाही रस्त्याची दुरवस्था कायम असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तीन मीटर रुंदीच्या सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचा दर्जा तपासून संबंधित बांधकाम अभियंत्यावर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पंचायत समितीमार्फत या रस्त्याच्या कामासाठी २० लाख रुपये मंजूर झाले आहेत. मात्र, रस्त्यावर अद्याप खड्डे असून कामाच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. काम न करताच किंवा निकृष्ट काम करून निधी काढण्यात आल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

या कामाचा ठेका शिवरी येथील किरण कामथे यांनी घेतला असून प्रत्यक्ष काम पोटठेकेदार नितीन काळे यांच्याकडून करून घेतल्याचे पंचायत समितीचे बांधकाम उपअभियंता संतोष नलावडे यांनी सांगितले. रस्त्याची लांबी २०० मीटर असून अद्याप रस्त्याच्या कडेला माती भरावासह काही कामे बाकी असल्याचेही नलावडे यांनी स्पष्ट केले आहे.

मात्र, अधिकारी पूर्ण बिले काढण्यात आल्याचे सांगत ग्रामस्थांनी त्यांच्या स्पष्टीकरणावर प्रश्न उपस्थित केला आहे. कामाचा दर्जा तपासल्याशिवाय निधी वितरित करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची खातेनिहाय चौकशी करण्याची मागणी आरपीआय (आठवले)चे तालुकाध्यक्ष बळीराम सोनवणे यांनी केली आहे. दरम्यान, सोनोरी गावातील यापूर्वीच्या विकासकामांबाबतही ग्रामस्थांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. त्यामुळे रस्त्याच्या कामाची तांत्रिक तपासणी करून प्रत्यक्ष काम, मंजूर निधी, खर्च आणि कामाच्या दर्जाची पडताळणी करावी.

# गणपती भक्तांसाठी मुंबई-मडगाव दरम्यान आणखी चार विशेष गाड्या

**मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणात जाणाऱ्या भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन रेल्वेने मुंबई-पनवेल ते मडगाव दरम्यान आणखी चार विशेष गाड्यांच्या सेवा जाहीर केल्या आहेत. या चार सेवांमुळे गणपती विशेष गाड्यांची आतापर्यंतची एकूण संख्या ३९४ झाली आहे. नियमित गाड्यांव्यतिरिक्त मध्य रेल्वेच्या २६२, पश्चिम रेल्वेच्या ६४, कोकण रेल्वेच्या ६२ आणि दक्षिण मध्य रेल्वेच्या सहा विशेष गाड्यांचा यात समावेश आहे.

पनवेल-मडगाव-पनवेल मार्गावर चार विशेष सेवा चालविण्यात येणार आहेत. गाडी क्रमांक ०१११३ पनवेलहून २१ आणि २८ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता सुटून त्याच दिवशी रात्री ११.५५ वाजता मडगावला पोहोचेल. परतीच्या प्रवासासाठी गाडी क्रमांक ०१११२ मडगावहून २० आणि २७ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता पनवेलला पोहोचेल.

या विशेष गाड्यांना पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवि आणि करमाळी या स्थानकांवर थांबे देण्यात आले आहेत. गाडीच्या डब्यांमध्ये एक प्रथम वातानुकूलित, दोन वातानुकूलित द्वितीय, चार वातानुकूलित तृतीय, दोन वातानुकूलित तृतीय इकॉनॉमी, सहा शयनयान, चार सामान्य द्वितीय श्रेणी, एक द्वितीय आसनासह गार्ड ब्रेक व्हॅन आणि एक जनरेटर व्हॅनचा समावेश आहे.

गाडी क्रमांक ०१११३ साठीचे आरक्षण २० सप्टेंबरपासून सर्व प्रवासी आरक्षण प्रणाली केंद्रांवर तसेच आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर सुरू होणार आहे. सामान्य दराने अनारक्षित डब्यांचे तिकीट 'यूटीएस' प्रणालीद्वारे काढता येणार आहे. प्रवाशांना तिकीट आरक्षणासाठी 'रेलवन' ॲपचाही वापर करता येईल. विशेष गाड्यांच्या विविध स्थानकांवरील सविस्तर वेळा जाणून घेण्यासाठी भारतीय रेल्वेच्या चौकशी संकेतस्थळाचा किंवा 'एनटीईएस' ॲपचा वापर करण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

**बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda**

**डॉ. ॲनी बेझंट रोड/वरळी नाका शाखा,** तुळशी विहार, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई - १८. ई-मेलः dbworl@bankofbaroda.bank.in

**संक्षिप्त वाहन ई-लिलाव सूचना**

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, पक्षकारांनी केलेल्या हायपोथिकेशन/कर्ज करारांतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून बँकेने खाली नमूद केलेले हायपोथिकेटेड मोटार वाहन ताब्यात/जप्त केले आहे आणि खाली नमूद केलेल्या खात्यातील थकबाकीच्या वसुलीसाठी "जसे आहे जिथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "जे काही आहे ते" तत्त्वावर वाहनाची विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार/वाहन/एकूण थकबाकी/राखीव किंमत/ई-लिलाव तारीख व वेळ, ईएमडी आणि बोली वाढीव रकमेचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केला आहे -

| कर्जदार / जामीनदार यांचे नाव व पत्ता | एकूण थकबाकी | वाहनाची कंपनी व मॉडेल आणि आर.टी.ओ. नोंदणी क्र. | १. ई-लिलावाची तारीख, ई-लिलावाची वेळ (प्रारंभ वेळ ते समाप्ती वेळ) २. बोली सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ | १. राखीव किंमत २. बयाणा रक्कम जमा (ई.एम.डी.) ३. बोली वाढीव रक्कम | ई.एम.डी. जमा खाते क्र., आय.एफ.एस.सी. कोड, शाखा | वाहन / जंगम मत्ता पाहणी तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| तन्मय सरकार (कर्जदार) फ्लॅट क्र. ९०२, 'ए' विंग, पुष्पांजली फेज १, वेदांत हॉस्पिटलजवळ, जी.बी. रोड, ठाणे, महाराष्ट्र - ४००६०७ | रु. ४९,३३,१७६.०० + लागू न केलेले व्याज + इतर खर्च | नोंदणी क्रः MH04LT9952<br>नोंदणी वर्षः २०२४<br>उत्पादक कंपनीः टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रायव्हेट लिमिटेड<br>मॉडेल क्रः फॉर्च्युनर लेजेंडर (एटी)<br>रंगः व्हाईट पर्ल आणि ब्लॅक<br>इंजिन क्रः 1GDA779244<br>चेसिस क्रः MBJAA3GS800604463-0124<br>इंधनः डिझेल | १. ई-लिलावाची तारीखः २८-१०-२०२६<br>ई-लिलावाची वेळः प्रारंभ वेळ दुपारी १४.०० वाजता ते समाप्ती वेळ १८.०० वाजता<br>२. बोली सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळः २७-१०-२०२६ सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत | १. राखीव किंमतः रु. ३१,००,०००.००<br>२. बयाणा रक्कम जमा (ई.एम.डी.): रु. ३,१०,०००.००<br>३. बोली वाढीव रक्कमः रु. २५,०००.०० | खाते क्रः 99160015181869<br>आयएफएससीः BARBODBWORL (पाचवे अक्षर शून्य आहे)<br>शाखाः बँक ऑफ बडोदा, वरळी नाका शाखा, मुंबई | पाहणीची तारीखः १२-१०-२०२६<br>वेळः सकाळी ११.०० ते दुपारी ०४.०० वाजेपर्यंत<br>यार्डचा पत्ताः बेसमेंट २, लोढा बी.एम.सी. पार्किंग, कमला मिल जवळ, लोअर परेळ - ४०००१३ |

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी, कृपया वेबसाईट लिंक आणि ऑनलाइन लिलाव पोर्टल **https://baanknet.com** ला भेट द्या/संदर्भ घ्या. इच्छुक बोलीधारक **श्री. अंशुमन मंत्री यांच्याशी मोबाईल क्र. ९५४९११४८९९ / ८६५२६३९८२७** वर संपर्क साधू शकतात.

दिनांकः १९-०९-२०२६
स्थानः मुंबई

अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा

**बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda**

बँक ऑफ **बडोदा विक्रोळी** शाखा, गाला क्र. १, विक्रोळी शिवकृपा इंडस्ट्रियल इस्टेट, एलबीएस रोड, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०००८३,
फोनः +९१ २२ २५७८८५६९, २५७८ ८०७१ ई-मेलः Vikhro@bankofbaroda.bank.in

**परिशिष्ट IV-ए [नियम ६(२) आणि ८(६) चे परंतुक पहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री नोटीस**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ६(२) आणि ८(६) च्या परंतुकान्वये वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री नोटीस.**

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार, गहाणखतदार आणि जामीनदार यांना नोटीस देण्यात येते की, सुरक्षित धनकोंकडे गहाण/प्रभारित ठेवलेली खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, ज्यांचा ताबा बँक ऑफ बडोदाच्या (सुरक्षित धनको) प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती खाली नमूद केलेल्या खात्यातील/खात्यांमधील देयकांच्या वसुलीसाठी "जसे आहे जिथे आहे तत्त्वावर", "जसे आहे जे आहे तत्त्वावर", आणि "जे काही आहे तिथे तत्त्वावर" विकली जाईल. कर्जदार / गहाणखतदार / जामीनदार / सुरक्षित मालमत्ता / थकीत देयके / राखीव किंमत / ई-लिलावाची तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचा तपशील खाली नमूद केला आहेः

| कर्जदार / जामीनदार / गहाणखतदार यांचे नाव आणि पत्ता | ज्ञात बोजांसह (असल्यास) स्थावर मालमत्तेचे सविस्तर वर्णन | एकूण थकीत देयके | १. ई-लिलावाची तारीख २. ई-लिलावाची वेळ (सुरुवातीची वेळ ते संपण्याची वेळ) | १. राखीव किंमत २. इसारा अनामत रक्कम (ईएमडी) ३. बोली वाढीची रक्कम | ताब्याची स्थिती (रचनात्मक/ प्रत्यक्ष) | मालमत्ता तपासणीची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| श्री. सतीश बजरंग बागल<br>ए) दुकान क्र. ९, इन्फिनिटी हाईट्स, प्लॉट क्र. ए/२३, सेक्टर १४, कळंबोली - ४१०२१८<br>बी) फ्लॅट क्र. ६०३, ६ वा मजला, विघ्नहर रेसिडेन्सी, गाव करंजाडे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६<br>श्री. बजरंग रामचंद्र बागल<br>ए) दुकान क्र. ९, इन्फिनिटी हाईट्स, प्लॉट क्र. ए/२३, सेक्टर १४, कळंबोली - ४१०२१८<br>बी) फ्लॅट क्र. ६०३, ६ वा मजला, विघ्नहर रेसिडेन्सी, गाव करंजाडे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६ | श्री. सतीश बजरंग बागल (श्री. बजरंग रामचंद्र बागल यांचा मुलगा) आणि श्री. बजरंग रामचंद्र बागल यांच्या नावावर असलेल्या, गाव करंजाडे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, पिन कोड - ४१०२०६ च्या सेक्टर ५ए मधील प्लॉट क्र. ४८ वर बांधलेल्या "विघ्नहर रेसिडेन्सी" नावाच्या इमारतीमधील आणि "विघ्नहर रेसिडेन्सी सी. एच. एस. एल." म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोसायटीमधील ६ व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ६०३ चे इक्विटेबल गहाणखत, ज्याचे मोजमाप ४६१ चौरस फूट बिल्ट-अप क्षेत्र आहे.<br>मालमत्तेची चतुःसीमाः उत्तरेसः फ्लॅट क्र. ६०४, दक्षिणेसः पॅसेज, पूर्वेसः जिना / खुली जागा, पश्चिमेसः फ्लॅट क्र. ६०१, ६०२, लिफ्ट आणि जिना.<br>बँकेला ज्ञात असलेले बोजेः ज्ञात नाही | रु. ३९.९८ लाख + लागू न झालेले व्याज + इतर आकारणी | १. ई-लिलावाची तारीखः ०७-१०-२०२६<br>२. ई-लिलावाची वेळः सुरुवातीची वेळः दुपारी २.०० ते संपण्याची वेळः सायं ६.०० वाजेपर्यंत | **१. राखीव किंमतः रु. ४२,३२,०००.००<br>२. इसारा अनामत रक्कम (ईएमडी): रु. ४,२३,२००.००<br>३. बोली वाढीची रक्कमः रु. २५,०००.००** | **प्रत्यक्** | **२९-०९-२०२६ सुरुवातीची वेळः सकाळी ११.०० ते संपण्याची वेळः सायं ०४.०० वाजेपर्यंत** |

विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्तींसाठी, कृपया **https://www.bankofbaroda.in/e-auction.htm** या वेबसाईट लिंक आणि https://baanknet.com या ऑनलाईन लिलाव पोर्टलचा संदर्भ घ्या / भेट द्या. तसेच, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकारी यांच्याशी **मोबाईल क्र.: ९५४९११४८९९ / ८६५२६३९८२६** वर संपर्क साधू शकतात.

**दिनांकः १९.०९.२०२६ ठिकाणः मुंबई**

**प्राधिकृत अधिकारी, बँक ऑफ बडोदा**